# ऋणनिर्देश

अनंत काणेकरांच्या प्रवासवर्णनांचा अभ्यास करण्याची दृष्टी आणि दिशा दिली ती माझ्या प्रबंधिकेचे मार्गदर्शक डॉ. पी.व्ही. कुलकर्णी यानीच. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळेच मला अनंत काणेकरांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाकडे पाहण्याची सम्यक दृष्टी मिळाली. सरांच्या चिकित्सक मार्गदर्शनामुळे काणेकरांच्या प्रवासवर्णनाचे स्वरूप उलगडत गेले. त्यामुळे माझा आत्मविश्वास दुणावला. सरांच्या मला सतत प्रयत्नशील बनविणाऱ्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकलो.

माझ्या या प्रबंधिकेला देवचंद कॉलेज, अर्जुननगर येथील सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी विशेषत: श्री.शुक्ल सर, श्री.आर.पी.शहा, श्री. इंदलकर यांनी आत्मीयतेने केलेले सहकार्य फारच उपयुक्त ठरले. तसेच बॅ.खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ या ग्रंथालयातील ग्रंथाची मौलिक मदत झाली. करवीर वाचनालय, कोल्हापूर, गंगानगर वाचनालय, गंगानगर इचलकरंजी, येथील ग्रंथालयाची खूपच मदत झाली तसेच रत्नदीप हायस्कूल गंगानगर येथील शिक्षक श्री. बी.जे, पाटील यांच्याकडील ग्रंथामुळे माझ्या कामाला मदत झाली.

ज्योतीबा नागराज चव्हाणदादा व माई तसेच माझे आई-वडिल यांचेही आशिर्वाद पाठीशी होते. म्हणूनच मी ही प्रबंधिका पूरी करू शकलो त्यांचा व उपरोक्त सर्वांचा मी अत:करणपूर्वक ऋणी आहे.

२० एप्रिल १९९७.　　　　( अमृतलिंगराव ना. माळगे )

स्थळ : कणगले